**'नीट' शुल्क परतावा आता थेट विद्यार्थ्यांच्याच खात्यात**

सविस्तर वृत्त पान ३ वर

www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -19, अंक-38 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, 25 मे 2026 ■ किंमत 2 रूपये, पाने -4

## आण्णा हजारेंकडून कॉक्रोच जनता पार्टीचं कौतुक, सरकारला सल्लाही दिला

जळगाव (अट्टल मत प्रतिनिधी)

देशभरात गेल्या आठवडाभरापासून सोशल मीडियातील पॉवर दाखवून देणाऱ्या कॉक्रोच जनता पार्टीच्या अकाऊंटची आणि त्याचे संस्थापक अभिजीत दिपकेंची जोरदार चर्चा सुरु आहे. एकेकाळी अण्णा हजारेंच्या भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनाचा भाग राहिलेल्या अभिजीत दिपकेच्या या पक्षाबाबत आण्णा हजारेंना विचारण्यात आल्यानंतर त्यांनी कॉक्रोज जनता पार्टीचं समर्थन केलंय. झुरळ हे नाव योग्य नसलं तरी देशातील जनता या पार्टीच्या पाठीशी उभी आहे, असे आण्णा हजारे यांनी म्हटलं. आता, आण्णा हजारेंच्या या वक्तव्यावर भाजप नेते गिरीश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे. लवकरच मी आण्णा हजारेंची भेट घेणार असल्याचं महाजन यांनी म्हटलं.

कॉक्रोच जनता पार्टीच्या संस्थापकांनी सरन्यायाधीशांच्या वक्तव्याचा निषेध करत कॉक्रोच जनता पार्टी असे नाव ठेऊन सोशल मीडियात अकाऊंट बनवलं होतं, अवघ्या ५ दिवसांतच या अकाऊंटवर १ कोटीपेक्षा जास्त फॉलोअर्स झाल्याने देशभरात याची चर्चा सुरू होती. अनेक राजकीय पक्षांनी या पार्टीचं समर्थन करताना, ही देशातील तरुणाईची भावना असल्याचे म्हटले. आता, आण्णा हजारे यांनीही याबाबत आपलं मत मांडलं आहे. झुरळ हे नाव योग्य नसलं तरी देशातील जनता या पार्टीच्या पाठीशी उभी आहे, असे आण्णांनी म्हटलं. मुळात हे समजून घेतलं पाहिजे की, या पार्टीने झुरळ म्हणण्याचा उद्देश काय होता? नाव योग्य नसेल तरी झुरळ पार्टीच्या मागे देशातील तरुण उभा राहिला हे महत्त्वाचे आहे. युवाशक्ती ही राष्ट्रशक्ती आहे, या दोन्हीचा संगम होतो तेव्हा सरकारने त्याचा अव्हेर न करता त्यांना प्रोत्साहन द्यायला हवे, असा सल्ला अण्णा हजारे यांनी दिला.

आण्णा हजारेंच्या या वक्तव्यावरुन आता भाजप नेते तथा मंत्री गिरीश महाजन यांनी प्रतिक्रिया दिलीय. मी लवकरच अण्णा हजारे यांची भेट घेणार आहे, अनेक वर्षांपासून त्यांची माझी भेट नाही, असे महाजन यांनी म्हटले. मात्र, कॉक्रोच जनता पार्टी आणि लोकायुक्त अंमलबजावणीसंदर्भातील वक्तव्यावर स्पष्टपणे उत्तर देणं महाजन यांनी टाळलं आहे. दरम्यान, राज्यात लोकायुक्त कायद्याला जरी संमती मिळाली असली तरी त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही. त्यावरून जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी नाराजी व्यक्त करत आता लोकायुक्त अंमलबजावणीसाठी आंदोलन करावं लागतं की काय?, असे उद्गार काढले आहेत.

## मोटेगावकरांचा तांब्यातून विद्यार्थ्यांवर पाणी शिंपडण्याचा व्हिडिओ व्हायरल; अंनिसचा संताप, कसून चौकशीची मागणी

लातूर (अट्टल मत प्रतिनिधी)

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपर फुटीप्रकरणात सीबीआयने लातूरमधील आरसीसी क्लासेसचे सर्वेसर्वा शिवराज मोटेगावकर यास अटक केली आहे. नीट पेपर फोडण्यात मोटेगावकरचा थेट सहभाग असून त्याने ८ दिवस अगोदरच प्रश्नपत्रिका मिळवल्याचं सीबीआयच्या (CBI) तपासातून समोर आलं. त्यानंतर, मोटेगावकरचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाले आहेत. त्यामध्ये, परीक्षेनंतर विद्यार्थ्यांसोबतचा संवाद असेल किंवा आपल्या क्लासेसमध्ये जे शिकवलं तेच परीक्षेत आल्याचं सांगणारा व्हिडिओ असेल. आता, मोटेगावकरचा एक अंधश्रद्धा पसरवणारा व्हिडिओ व्हायरल झाल्याने खळबळ उडाली आहे. त्यावर, अंधश्रद्धा निर्मुलन समिती तीने प्रतिक्रिया देत, पोलीस तपासाची मागणी केलीय.

नीट पेपरफुटी प्रकरणामुळे आधीच राज्यभर चर्चेत असलेल्या शिवराज मोटेगावकर यांचा आणखी एक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये ते विद्यार्थ्यांवर तांब्याच्या भांड्यातील पाणी गवताच्या सहाय्याने शिंपडताना दिसत असल्याचा दावा केला जात आहे. या व्हिडिओनंतर विविध स्तरातून संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. काहींनी तर हा अशोक खरातसारखाच घोर प्रकार असल्याची भावना सोशल मीडियावर व्यक्त केलीय. आता, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती तीचे राज्याध्यक्ष माधव बावगे यांनीही अशा प्रकारावर आक्षेप घेतला आहे.

**पोलिसांनी कसून चौकशी करावी - बावगे**

शैक्षणिक क्षेत्रात वैज्ञानिक दृष्टीकोन रुजवला पाहिजे, त्याठिकाणी असे काम आणि अंधश्रद्धेचे प्रकार घडत असतील तर याचा जाहीर निषेध महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती करते, अशी प्रतिक्रिया माधव बावगे यांनी दिली. तसेच पोलिसांनी याची कसून चौकशी करावी, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे. दुसरीकडे आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांनीही ट्विट करून प्रश्न विचारला आहे. AIMS मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांवर शिवराज मोटेगावकर यांनी मंतरलेले पाणी शिंपडले. मग हे नेमकं अशोक खरात यांच्या उष्णो जलच्या दाव्यांपेक्षा वेगळं कसं? जेव्हा अंधश्रद्धा हा व्यवसाय बनतो आणि मोठ्या लोकांशी ओळखी हे संरक्षणाचं कवच बनतं, तेव्हा त्याची किंमत सामान्य जनतेला मोजावी लागते. चमत्कारांचे दावे करणारी व्यक्ती तरुणांच्या विचारविश्वाला दिशा देण्याच्या भूमिकेत असू नये. दैवी उपचारांचे दावे असोत, श्रद्धेचे शोषण असो किंवा सत्तेचा गैरवापर असो,उपाय एकच आहे, निष्पक्ष चौकशी, आणि सर्वांसाठी समान न्याय, असे विजय कुंभार यांनी म्हटलं आहे. त्यामुळे, आता या व्हायरल व्हिडिओवरुन मोटेगावकरवर कारवाई होती का, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## संजय गायकवाड फक्त कव्हर पेज वाचतो, किमान प्रस्तावना वाचावी, अंबादास दानवेंनी दगलबाज शिवाजी पुस्तकावर बंदीच्या मागणीवरुन गायकवाडांना सुनावलं

छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधानपरिषदेचे आमदार अंबादास दानवे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांच्यावर टीका केली आहे. प्रबोधनकार ठाकरे यांच्या दगलबाज आणि कॉ. गोविंद पानसरे यांच्या शिवाजी कोण होता? या पुस्तकावरील बंदीसाठी मुख्यमंत्र्यांकडे आग्रह धरणार असल्याचं वक्तव्य आमदार संजय गायकवाड यांनी केलं होतं. त्याला अंबादास दानवे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. अंबादास दानवे म्हणाले की, मला असं वाटतं संजय गायकवाड फक्त कव्हर पेज वाचतो, आत मध्ये काय आहे त्याला माहीत नाही मला असं वाटतं किमान त्याने प्रस्तावना तरी वाचावी.



अंबादास दानवे म्हणाले की, दगलबाज शिवाजी, शिवाजी कोण होता? या पुस्तकावर बंदी घालण्यासाठी अधिवेशनात मागणी करणा असल्याचं संजय गायकवाड यांनी म्हटलंय. मला असं वाटतं संजय गायकवाड फक्त कव्हर पेज वाचतो, आतमध्ये काय आहे त्याला माहीत नाही. मला असं वाटतं किमान त्याने प्रस्तावना तरी वाचावी, असा टोला अंबादास दानवे यांनी लगावला. प्रबोधनकार ठाकरे ने लिहिलेलं आहे ते पुस्तक, ज्या प्रबोधनकारांच्या विचारावर शिवसेना चालते तुम्ही अशा प्रकारे बोलता. मला असं वाटतं एकनाथ शिंदे साहेबांनी अशा वाचाळविरांचा बंदोबस्त केला पाहिजे, असंही दानवे म्हणाले.

**आमदार संजय गायकवाड काय म्हणाले?**

छत्रपतींचा एकेरी उल्लेख केल्याबद्दल जी काही मी शिवीगाळ केली होती त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त केली आहे. यापुढेही शिवरायांचा अपमान करणाऱ्याचा विषय असेल तर मी माझ्या भूमिकेवर ठाम आहे. येणाऱ्या विधानसभा अधिवेशनात दगलबाज,शिवाजी शिवाजी कोण होता या पुस्तकांवर बंदी आणण्याकरता मी मुख्यमंत्री साहेबांकडे आग्रही असणार आहे, असं संजय गायकवाड म्हणाले.

## २२० केव्ही उपकेंद्र सांवगी परिसरात अवैध मुरूम उत्खनन

### सुरक्षा भिंत व वीज वाहिन्यांना धोका



छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)

२२० केव्ही उपकेंद्र सांवगी परिसरात रात्रीच्या वेळी अज्ञात व्यक्तीकडून अवैध मुरूम उत्खनन सुरू असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. हे उपकेंद्र अशरफपूर गावातील कबीर मठाजवळ ग्रामपंचायत हद्दीत येते. याबाबत अतिरिक्त कार्यकारी अभियंत्यांनी ग्रामपंचायतीकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २० मे २०२६ रोजी रात्री उपकेंद्राच्या मुख्य रस्त्यालगत बाजूच्या परिसरातून मोठ्या प्रमाणात मुरूम काढून नेण्यात आला. यापूर्वीही अशाच प्रकारची घटना घडल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी पत्राद्वारे निदर्शनास आणून दिले होते.

अवैध उत्खननामुळे उपकेंद्राच्या ३३ केव्ही यार्डबाहेरील सुरक्षा भिंतीला धोका निर्माण झाला असून ती कोसळण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तसेच महापारेषणच्या १३२ केव्ही आणि ३३ केव्ही क्षमतेच्या वीजवाहिन्यांचे पोल देखील धोक्यात आले आहेत.

या प्रकारामुळे मोठी वित्तीय व जीवितहानी होण्याची शक्यता असून, परिस्थिती गंभीर झाल्यास छत्रपती संभाजीनगर शहराच्या मोठ्या भागाचा वीजपुरवठा खंडित होऊ शकतो, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे.

दरम्यान, संबंधित प्रशासनाने तातडीने योग्य ती कारवाई करून अवैध उत्खनन रोखावे, अशी मागणी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, २२० केव्ही उपकेंद्र सांवगी यांनी केली आहे.



# अधिक मासः सौर वर्ष व चांद्र वर्ष यांतील फरक

यंदा सन २०२६मध्ये अधिक मास (पुरुषोत्तम मास/धोंड्याचा महिना) १७ मे २०२६ ते १५ जून २०२६ या कालावधीत असणार आहे, जो 'अधिक ज्येष्ठ' महिना आहे. दर ३ वर्षांनी येणारा हा अतिरिक्त चंद्र महिना आहे, जो सौर व चांद्र वर्षातील फरक भरून काढतो. या पवित्र महिन्यात दान, जप आणि विष्णूची उपासना करणे विशेष फलदायी मानले जाते. सदर ज्ञानवर्धक संकलित माहितीचा लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी वाचक सेवेशी प्रस्तुत करताहेत.... संपादक.

पुरुषोत्तम मासात करावयाची जी सारी व्रते आहेत, ती सारी भ.कृष्णाची आणि भ.विष्णूची आराधना करायला सांगणारीच आहेत. यात्रा, तीर्थस्नान, दान याबरोबर दीपपूजनाचे पण या व्रतास महत्व आहे. आपण जे जे करून खाऊ ते ते सारे भ.कृष्णास अर्पण करावे आणि तेही शुद्ध मनाने अर्थात मनामध्ये विकल्प न ठेवता करणे, ही गोष्ट सर्वात महत्वाची आहे. हे अधिक मासाचे व्रत वनवास भोगणाऱ्या पांडवांना परत राज्यप्राप्ती होण्याचा, पूर्व वैभव प्राप्त होण्याचा उपाय म्हणून भगवान श्रीकृष्णाने करावयास सांगितले, असे पुराणात उल्लेख सापडतात. संपूर्ण अधिक मास ज्यांना व्रत करणे शक्य नसते, ते या महिन्यातील दोन एकादशिंच्या दिवशी तरी हे व्रत करतात, असे सांगतात. या व्रताचे उद्यापन करताना अत्यंत साधेपणाने भ.श्रीकृष्ण पूजन करून' 'आवाहनं न जानामी' असे म्हणून प्रार्थना करतात आणि साष्टांग नमस्कार घालतात. महानैवेद्य देऊन श्रीकृष्णार्पणमस्तू म्हणतात, असे सांगितले गेले आहे. अधिक मासामध्ये एकभुक्त राहून त्या महिन्यातील शुभदिनी स्त्री पुरुष उभयतांनी शुचिर्भूत होऊन भ.श्रीकृष्णाचे मनोमन ध्यान करून उपवास करतात, नैवेद्य दाखवतात आणि यथाशक्ती दानधर्म करतात. अधिक महिन्यात भ.विष्णुस्वरूप सुर्यदेवतेचे पूजन व्रत म्हणून केले जाते, असे सांगितले आहे.

आपल्याकडे आपण लेक (कन्या) व जावयांना लक्ष्मी नारायणाचे प्रतीक मानतो, त्यांना वाण द्यावयाच्या निमित्ताने घरी जेवावयास बोलाविले जाते. लेक (कन्या) - जावयाच्या रुपाने आपल्या घरी आलेल्या लक्ष्मी-नारायणांना ओवाळल्यानंतर तेहेतीस वस्तूंचे (अनारसे, बत्तासे, मैसूर पाक इत्यादी जाळीदार वस्तू) दान दिल्यानंतर त्यांना नमस्कार-वंदन केले जाते. या वेळेस दिपदानाचे पण महत्व अधिक असल्याचे सांगितले आहे. अधिक मासामध्ये अधिक मासाची पोथी महिनाभर श्रद्धेने वाचून महिन्याच्या शेवटी उद्यापनाचे वेळी पोथी दान करतात. अधिक मासामध्ये दानधर्म करून पुण्य मिळवायचे खूप मार्ग आणि व्रते सांगितलेली आहेत. या महिन्यात अन्नदान, वस्त्रदान, पुस्तक दानही केले जाते. सकाळी लवकर उठून स्नान करून भ.श्रीकृष्णाचा 'ओम नमो भगवते वासुदेवाय' असा जप करतात. अधिक महिन्यात श्रीसूक्त, पुरुष सूक्त, विष्णु सहस्त्रनाम, हरिवंश पुराण, हरिपाठ आणि भागवत पुराण यांचे वाचन करतात, असे सांगितले आहे. या मासात शक्यतो एक वेळच अन्नग्रहण करतात, या व्रताला एक भुक्त किंवा नक्त असे म्हणतात. आवळ्याच्या झाडाखाली बसून आवळी भोजन करण्याचे पण महत्व अधिक मासात सांगितले आहे. या महिन्यात कोकिळा व्रत पण केले जाते. अधिक महिन्यात रोज देवाजवळ दिवा लावतात व तो दिवा महिन्याच्या शेवटी सत्पात्री ब्राह्मणाला दान करतात. या महिन्यात आपल्याला आवडणाऱ्या एखाद्या वस्तूचा त्याग करतात. अधिक महिन्यात नारळ, सुपाऱ्या, फळे यासारख्या वस्तु तेहेतीसच्या पटीत घेऊन दान करतात. या महिन्यात तेहेतीस सुवासिनींची ओटी भरणे, तेहेतीस ब्राम्हणांना भोजन घालणे, तेहेतीस मेहुण्यांना भोजन घालणे, तेहेतीस सत्यनारायण करणे इत्यादी व्रते करून पुण्य प्राप्त केले जाते. या महिन्यात तेहेतीस गरीब गरजू विद्यार्थ्यांना किंवा एखाद्या सामाजिक संस्थेला पैशाच्या रूपाने मदत करून सामाजिक भान ठेवण्याचे व्रत पण केले जाते.

वर्षाच्या इतर बारा महिन्यांमध्ये भरपूर धार्मिक सण, समारंभ येत असतात, त्यामुळे आपण प्रत्येक जण खूप गडबडीत आणि घाईमध्ये असतो. कुठलाही विचार शांतपणाने करायला खर तर आपल्याजवळ वेळही नसतो. हल्ली अधिक मासामध्ये करायला सांगितलेल्या गोष्टींचं आचरण करायला कोणालाही आवडत नाही, कारण ते जुन्या पठडीतले वाटते आणि त्यामुळे त्याच्याकडे कोणी लक्षही देत नाही आणि ते करायला कोणाकडे वेळही नसतो. अधिक मासाच्या निमित्ताने त्याबद्दल थोडेफार वाचताना किंवा अधिक मासाबद्दल समजून घेताना मला असे जाणवते, की अधिक मासाच्या निमित्ताने केलेले जपजाप्य, निरनिराळ्या प्रकारचे दानधर्म, पोथ्यांचे वाचन, भ.श्रीकृष्णाचा जप, विष्णुसहस्रनामाचे पठण, भागवत पुराणाचे पठण, केली जाणारी निरनिराळी व्रतवैकल्ये यातून माणसाला खरच खूप मानसिक स्वास्थ्य आणि शांतता नक्की मिळत असणार, असे वाटते. त्याचप्रमाणे अधिक मासामध्ये एकभुक्त राहाणे किंवा आपल्या आवडीचा एखादा पदार्थ महिनाभर न खाणे यासारखी व्रते करायला सांगितली आहेत, त्यातून मलातरी मनावर संयम ठेवायलाच शिकविले जाते, असे वाटते आणि माझ्या मते अशी व्रते किंवा जपजाप्य करणाऱ्या, पठणपाठन करणाऱ्या माणसांची मानसिक उंची नक्कीच चांगल्या प्रकारे वाढत असणारच, असे माझे स्वतःचे प्रामाणिक मत आहे! विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !! !! अधिक मास सर्वांना भरभराटीचा आणि सुख-समृद्धीचा जावो, अशी ईश्वर चरणी प्रार्थना जी !!

– संकलन व सुलेखन–

श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी. (दिनविशेषकार)

# नीट पेपरफुटी : शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवरचा घाला

**देशातील** लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा निर्णय ठरवणारी आणि वैद्यकीय शिक्षणाचे प्रवेशद्वार मानली जाणारी नीट परीक्षा आज गंभीर संशयाच्या भोवऱ्यात अडकली आहे. डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा केवळ एक शैक्षणिक प्रक्रिया नसून आयुष्य घडवणारा टप्पा असतो. परंतु, या परीक्षेत झालेल्या कथित पेपरफुटी, गुणांमधील संशयास्पद वाढ, परीक्षा केंद्रांवरील गैरव्यवस्था आणि संगनमत ताच्या आरोपांनी देशातील शिक्षण व्यवस्थेची विश्वासार्हताच डळमळीत केली आहे. ही केवळ एका परीक्षेची चूक नाही तर हा देशातील शिक्षण व्यवस्थेच्या नैतिक अधःपतनाचा आणि सरकारी यंत्रणांच्या अपयशाचा गंभीर इशारा आहे.

आजच्या काळात स्पर्धा परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांसाठी युद्धभूमीच बनली आहे. लाखो विद्यार्थी दोन-दोन, तीन-तीन वर्षे कठोर परिश्रम करून नीटची तयारी करतात. अनेक विद्यार्थी ग्रामीण भागातून, शेतकरी कुटुंबातून, आर्थिकदृष्ट्या कमकुवत परिस्थितीतून पुढे येतात. काहींचे पालक शेती विकतात, काही कर्ज काढतात, तर काही स्वतःच्या गरजा कमी करून मुलांच्या शिक्षणासाठी पैसा खर्च करतात. विद्यार्थीदेखील मित्र, मनोरंजन, सण-उत्सव यापासून दूर राहून दिवसाचे १२ ते १४ तास अभ्यास करतात. अशा वेळी जर प्रश्नपत्रिका परीक्षा सुरू होण्यापूर्वीच बाजारात विकली जात असेल, तर मेहनतीवर उभ्या असलेल्या व्यवस्थेचा पाया कोसळल्याशिवाय राहत नाही.

नीट पेपरफुटी प्रकरणाने देशभरातील विद्यार्थ्यांच्या मनात एक धोकादायक प्रश्न निर्माण केला आहे, मेहनत करून खरंच यश मिळते का? हा प्रश्न केवळ भावनिक नाही तर तो शिक्षण व्यवस्थेच्या अस्तित्वाशी संबंधित आहे. जेव्हा पैशांच्या जोरावर प्रश्नपत्रिका मिळवणारे विद्यार्थी प्रामाणिक विद्यार्थ्यांपेक्षा पुढे जातात, तेव्हा गुणवत्ता, प्रामाणिकपणा आणि स्पर्धेतील समान संधी या लोकशाही मूल्यांचाच पराभव होतो. गरीब विद्यार्थी अभ्यास करतो आणि श्रीमंत व्यवस्था विकत घेतो, अशी भावना समाजात निर्माण होणे ही अत्यंत धोकादायक बाब आहे.

या प्रकरणात राष्ट्रीय परीक्षा एजन्सीच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. देशातील सर्वात महत्त्वाच्या परीक्षांपैकी एक असलेल्या नीट सारख्या परीक्षेची प्रश्नपत्रिका सुरक्षित ठेवण्यात प्रशासन अपयशी ठरत असेल, तर ही बाब सामान्य नाही. डिजिटल इंडिया, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, बायोमेट्रिक तंत्रज्ञान अशा आधुनिक सुविधांचा गजर करणाऱ्या देशात परीक्षा सुरक्षेतील एवढी मोठी त्रुटी कशी राहू शकते? प्रश्नपत्रिका छपाईपासून वितरणापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेत जर गोपनीयता राखली जाऊ शकत नसेल, तर यंत्रणेत खोलवर भ्रष्टाचार आणि निष्काळजीपणा शिरल्याचे स्पष्ट होते.

या संपूर्ण घोटाळ्यामागे केवळ काही विद्यार्थी किंवा दलाल नसून एक संघटित रॅकेट कार्यरत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही तपासांत दलाल, कोचिंग क्लासेस, स्थानिक अधिकारी आणि राजकीय संरक्षण असलेल्या टोळ्यांचे संगनमत असल्याचे आरोप समोर आले. शिक्षण हे ज्ञान, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचे क्षेत्र असताना त्याला बाजारपेठ बनवण्याचा उद्योग सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. वैद्यकीय शिक्षणात प्रवेश मिळवण्यासाठी लाखो नव्हे तर कोट्यवधी रुपयांचे व्यवहार होतात, अशा चर्चा उघडपणे होत आहेत. ही परिस्थिती देशासाठी अत्यंत चिंताजनक आहे. कारण उद्या जर पैशाने प्रवेश मिळवलेले विद्यार्थी डॉक्टर बनले, तर त्याचा परिणाम केवळ शिक्षणापुरता मर्यादित राहणार नाही; तो थेट जनतेच्या आरोग्यावर होणार आहे.

पेपरफुटी प्रकरणाचा सर्वात गंभीर परिणाम विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर होत आहे. स्पर्धा परीक्षांचे दडपण आधीच प्रचंड असते. त्यात परीक्षा रद्द होईल का, पुन्हा परीक्षा घ्यावी लागेल का, निकालावर परिणाम होईल का, या अनिश्चिततेमुळे लाखो विद्यार्थी मानसिक तणावाखाली आले आहेत. अनेक विद्यार्थी नैराश्य, चिंता आणि भीती अनुभवत आहेत. देशाने यापूर्वी स्पर्धा परीक्षांच्या तणावामुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्याही पाहिल्या आहेत. त्यामुळे अशा घटनांकडे केवळ प्रशासकीय किंवा कायदेशीर मुद्दा म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. ही पिढीच्या मानसिक सुरक्षिततेची बाब आहे. दुर्दैवाने, अशा गंभीर विषयांवरही राजकारण सुरू होते. सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यात व्यस्त असतात पण विद्यार्थ्यांच्या भविष्याबाबत ठोस भूमिका घेणारे फार कमी दिसतात. संसदेत गदारोळ होतो, पत्रकार परिषदांत आरोप होतात, चौकशांच्या घोषणा केल्या जातात; मात्र प्रत्यक्षात दोषींना शिक्षा होण्याची प्रक्रिया वर्षानुवर्षे लांबते. त्यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात ‟पैसा असला की सुटता येते‟ अशी भावना निर्माण होते. ही भावना लोकशाहीसाठी घातक आहे.

भारतात पेपरफुटीचे प्रकार नवीन नाहीत. विविध राज्यांतील भरती परीक्षा, पोलीस भरती, शिक्षक भरती, एमपीएससी, रेल्वे परीक्षा अशा अनेक स्पर्धा परीक्षांमध्ये यापूर्वीही गैरप्रकार उघड झाले आहेत. म्हणजेच समस्या केवळ एका संस्थेपुरती मर्यादित नाही; ती संपूर्ण प्रणालीतील भ्रष्टाचार आणि कमकुवत नियंत्रण यंत्रणेची आहे. शिक्षण आणि रोजगाराच्या संधी कमी असताना स्पर्धा वाढते, आणि त्यातूनच गैरप्रकारांचे जाळे अधिक मजबूत होत जाते. बेरोजगारी आणि स्पर्धेच्या भीषण दडपणात अडकलेल्या समाजात परीक्षा ही काहींसाठी व्यवसाय बनते, हे वास्तव नाकारता येणार नाही.

या परिस्थितीत सरकारने केवळ आश्वासने देऊन चालणार नाही. कठोर आणि परिणामकारक उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. सर्वप्रथम परीक्षा प्रक्रियेला पूर्णपणे तंत्रज्ञानाधारित आणि पारदर्शक बनवणे गरजेचे आहे. प्रश्नपत्रिकांची छपाई, वाहतूक आणि वितरणासाठी एंड-टू-एंड डिजिटल ट्रॅकिंग प्रणाली लागू करावी. प्रत्येक टप्प्यावर जबाबदारी निश्चित करावी. परीक्षा केंद्रांवर बायोमेट्रिक पडताळणी, एआय-आधारित निरीक्षण, सायबर सुरक्षा आणि स्वतंत्र नियंत्रण कक्ष यांची अंमलबजावणी केली पाहिजे. प्रश्नपत्रिका गळतीसारख्या गुन्ह्यांना दहशतवादी किंवा आर्थिक गुन्ह्यांइतकीच गंभीर वागणूक देऊन दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. याशिवाय, परीक्षा घेणाऱ्या संस्थांची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करण्यासाठी कायमस्वरूपी स्वायत्त प्राधिकरण निर्माण करणे आवश्यक आहे. राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त आणि न्यायालयीन अधिकार असलेली स्वतंत्र यंत्रणा उभारली गेली तरच अशा प्रकरणांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येईल. चौकशी समित्यांच्या घोषणा करून प्रकरण दडपण्याची जुनी पद्धत आता थांबली पाहिजे. दोषींना जलदगती न्यायालयांतून शिक्षा झाली तरच भविष्यात अशा प्रकारांना आळा बसेल.

विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचाही विचार तितकाच महत्त्वाचा आहे. शिक्षण म्हणजे केवळ गुणांची स्पर्धा नाही, तर व्यक्तिमत्त्व घडवण्याची प्रक्रिया आहे, हा संदेश

समाजात पोहोचवणे गरजेचे आहे. पालकांनी मुलांवर अवास्तव अपेक्षांचे ओझे टाकू नये. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अपयश स्वीकारण्याची ताकद द्यावी. सरकारने प्रत्येक जिल्ह्यात समुपदेशन केंद्रे सुरू करून स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मानसिक आधार उपलब्ध करून द्यावा. कारण परीक्षा महत्त्वाची असली तरी विद्यार्थ्यांचे जीवन त्याहून अधिक महत्त्वाचे आहे.

आज गरज आहे ती शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा निर्माण करण्याची. विद्यार्थी जर व्यवस्थेवरच विश्वास ठेवेनासे झाले, तर देशाच्या प्रगतीचा पाया हादरेल. शिक्षण क्षेत्रात प्रामाणिकपणा, गुणवत्ता आणि समान संधी टिकवून ठेवण्यासाठी सरकार, न्यायव्यवस्था, शैक्षणिक संस्था आणि समाज यांनी एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे. अन्यथा ‟मेहनतीपेक्षा पैशाला महत्त्व‟ ही मानसिकता अधिक बळावेल आणि समाजातील नैतिक मूल्यांचे अधःपतन वेगाने वाढेल. नीट पेपरफुटी प्रकरण हे एका परीक्षेपुरते मर्यादित नाही; ते भारताच्या शिक्षण व्यवस्थेसमोर उभे राहिलेले आरसे आहे. त्या आरशात भ्रष्टाचार, निष्काळजीपणा, राजकीय हस्तक्षेप आणि व्यवस्थेतील ढासळलेली नैतिकता स्पष्ट दिसत आहे.

या आरशाकडे डोळेझाक करून चालणार नाही. कारण आज जर विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांना रोखले नाही, तर उद्या देशाच्या भविष्यालाच मोठी किंमत मोजावी लागेल.

– प्रवीण बागडे

# सार्वजनिक आरोग्य सेवेला बळ; शस्त्रक्रियांची अचूकता आणि सुरक्षितता वाढणार

**मुंबई, (अट्टल मत प्रतिनिधी)**

राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम आणि सर्वसामान्यांना दर्जेदार उपचार मिळावेत या उद्देशाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. मुंबईतील सेठ जी. एस. मेडिकल कॉलेज आणि केईएम रुग्णालय येथे अत्याधुनिक 'हाय-एंड व्हेसल सीलर' उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली असून, यामुळे शस्त्रक्रियांच्या गुणवत्तेत मोठी सुधारणा होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना अत्याधुनिक उपचार सुविधा मिळणार आहेत. या सीएसआर प्रकल्पांतर्गत दोन प्रगत इलेक्ट्रोसर्जिकल युनिट्स जनरल सर्जरी विभागासाठी 'इलेक्टिव्ह सर्जरी ओटी' जमेशदजी मेहता शस्त्रक्रिया कक्षामध्ये बसविण्यात आले आहेत.

केईएम रुग्णालय हे मुंबईतील सर्वात मोठ्या सार्वजनिक आरोग्य संस्थांपैकी एक असून येथे दररोज हजारो गरजू रुग्ण उपचारासाठी येतात. अशा परिस्थितीत अत्याधुनिक उपकरणांची गरज अत्यंत महत्त्वाची होती. नव्याने बसविण्यात आलेली ही उपकरणे शस्त्रक्रियेदरम्यान रक्तस्त्राव नियंत्रणासाठी उपयुक्त ठरणार असून रक्तवाहिन्या सील करून रक्तस्राव त्वरित थांबवण्यास मदत करतात. या उपकरणांमुळे शस्त्रक्रियेची अचूकता वाढेल, गुंतागुंत कमी होईल आणि रुग्णांच्या सुरक्षिततेत मोठी वाढ होईल. विशेषतः जटिल शस्त्रक्रियांमध्ये रक्तस्राव कमी होऊन डॉक्टरांना अधिक कार्यक्षमतेने उपचार करता येणार आहेत. या उपक्रमासाठी इंडियन ऑइल कंपनीने सहकार्य केले आहे त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आभार व्यक्त केले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत सांगितले की, 'राज्यातील प्रत्येक नागरिकाला गुणवत्तापूर्ण आणि अत्याधुनिक आरोग्य सेवा मिळणे ही शासनाची प्राथमिकता आहे. अशा प्रकल्पांमुळे सार्वजनिक रुग्णालयांची क्षमता वाढून गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळतो.' या उपक्रमामुळे केवळ आरोग्य सेवेची गुणवत्ता उंचावणार नाही, तर गरीब आणि वंचित घटकांसाठी आधुनिक वैद्यकीय सुविधांचा मार्गही अधिक सुलभ होणार आहे.

# रेशीम उद्योगाला नवे तंत्रज्ञानाचे; दिलीप हाके यांच्या 'सिल्क स्कॅनर' नवकल्पनेचा सरकारकडून भव्य सन्मान

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

राज्यातील रेशीम उद्योगासाठी क्रांतिकारी ठरणाऱ्या 'सिल्क स्कॅनर' या अत्याधुनिक नवकल्पनेमुळे निवृत्त रेशीम उपसंचालक दिलीप हाके यांचा राज्य सरकारतर्फे विशेष सन्मान करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या ॲग्रो हॅकथॉन स्पर्धेत उर्शीशपवीर ऋरवपरींळी यांच्या हस्ते हाके यांना चषक, सन्मानपत्र आणि तब्बल १५ लाख रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले.



रेशीम उत्पादन क्षेत्रातील अनेक वर्षांच्या अनुभवातून आणि संशोधनातून तयार करण्यात आलेले 'सिल्क स्कॅनर' हे उपकरण आता शेतकरी आणि रेशीम उत्पादकांसाठी वरदान ठरणार असल्याची चर्चा तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), स्पेक्ट्रोमिती संवेदक आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT) या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विकसित करण्यात आलेले हे उपकरण रेशीम कोषांची गुणवत्ता अचूकपणे तपासते. त्यामुळे कोषांची निवड, वर्गीकरण आणि उत्पादन प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्यास मोठी मदत होणार आहे.

**शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा**

सध्या रेशीम कोषांची गुणवत्ता तपासण्यासाठी पारंपरिक पद्धतींवर अवलंबून राहावे लागते. यामध्ये वेळ आणि श्रम मोठ्या प्रमाणात खर्च होतात. अनेकदा गुणवत्तेचे अचूक मूल्यांकन न झाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागते. 'सिल्क स्कॅनर'मुळे काही मिनिटांत कोषांची गुणवत्ता निश्चित होणार असून, शेतकऱ्यांना योग्य दर मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

**तंत्रज्ञान आणि शेतीचा संगम**

ॲग्रो हॅकथॉनमध्ये सादर करण्यात आलेल्या विविध नवकल्पनांमध्ये 'सिल्क स्कॅनर'ने विशेष लक्ष वेधून घेतले. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेती आणि पूरक उद्योग अधिक सक्षम करण्याच्या दिशेने ही महत्त्वपूर्ण पायरी असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हाके यांच्या कार्याचे कौतुक करताना, राज्यातील कृषी आणि ग्रामीण उद्योगांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणाऱ्या अशा नवकल्पना महाराष्ट्राला प्रगत दिशेने घेऊन जातील, असे सांगितले.

**ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना**

रेशीम उद्योग हा ग्रामीण भागातील रोजगाराचा महत्त्वाचा स्रोत मानला जातो. 'सिल्क स्कॅनर'सारख्या तंत्रज्ञानामुळे उत्पादनाची गुणवत्ता वाढून निर्यातक्षम रेशीम निर्मितीस चालना मिळेल, असा विश्वास तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. यामुळे महाराष्ट्रातील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे.

दिलीप हाके यांच्या या यशामुळे मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या नवकल्पनेची राष्ट्रीय पातळीवरही चर्चा सुरू झाली आहे.

ॲग्रो हॅकथॉनमध्ये सादर झालेल्या विविध नवकल्पनांमध्ये 'सिल्क स्कॅनर'ने विशेष लक्ष वेधून घेतले. ग्रामीण उद्योग आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम घडवणारी ही संकल्पना राज्यातील रेशीम उद्योगासाठी महत्त्वाची ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. दिलीप हाके यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे

# महसूल विभागाने जबाबदारी घेऊन कार्य करावे – अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे

**अमरावती (अट्टल मत प्रतिनिधी)**

महसूल विभाग हा समाजासाठी कार्य करणारा विभाग आहे. त्यामुळे विविध परिस्थितीमध्ये अनपेक्षित जबाबदाऱ्या या विभागावर येतात. मात्र जनतेसाठी कार्य करावयाचे असल्यामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जबाबदारी घेऊन कार्य करावे, असे आवाहन अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आज श्री. खारगे यांनी महसूलच्या अधिकाऱ्यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली. यावेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंदा दानेज आदी अधिकारी उपस्थित होते.

श्री. खारगे यांनी महसूलमधील अधिकाऱ्यांनी आठवड्यातून एक दिवस दौरा करावा. यामुळे प्रशासनावर पकड मजबूत करण्यास मदत होणार आहे.

दौरा करताना विविध विकासकामांची तपासणी केल्यास तथ्य जाणून घेण्यास मदत मिळणार आहे. त्यासोबतच जनतेशी भेटावे. त्यांनी दिलेल्या निवेदनांवर सकारात्मक कारवाई करावी. निवेदनावर केलेली कारवाई कळवावी. यामुळे नागरिकांच्या अडचणी लक्षात येतात. हे सर्व करीत असताना अधिनस्त कर्मचाऱ्यांशी संवाद साधून समस्याही जाणून घ्याव्यात. प्रशासनाने नागरिकांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करावा. नागरिकांच्या समस्या, तक्रारींचा निपटारा करण्यासाठी व्यवस्था निर्माण करावी. त्यांच्या तक्रारींचा मागोवा घ्यावा. शासनने ईज ऑफ डुइंग बिझनेसचे धोरण स्विकारले आहे. त्यानुसार १२ दुरूस्ती करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी जिल्ह्याची संक्षिप्त माहिती दिली. जिल्हा प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येणारे विविध उपक्रमांची माहिती त्यांनी यावेळी दिली. प्रामुख्याने जिल्ह्यात लोकसहभागातून निर्माण करण्यात येणाऱ्या पांदन रस्त्याची माहिती दिली.

तसेच रहिवासी जमिन नियमानुकूल करणे, पट्टेवाटप करणे, मिळकत पत्रिका वाटप करणे याबाबत माहिती दिली.

दरम्यान श्री. खारगे यांनी सकाळी अमरावती उपविभागीय अधिकारी कार्यालय, अमरावती तहसील कार्यालय, सहनिबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा अधीक्षक भूमिअभिलेख कार्यालय, वडाळी मंडळ अधिकारी कार्यालयाला भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली. यावेळी त्यांनी कार्यरत कर्मचारी यांच्याकडून कामकाजाची माहिती घेतली.

# 'नीट' शुल्क परतावा आता थेट विद्यार्थ्यांच्याच खात्यात

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

राष्ट्रीय परीक्षा संस्थेने (एनटीए) 'नीट' परीक्षेच्या शुल्क परताव्याबाबत एक अत्यंत महत्त्वाचा आणि विद्यार्थ्यांच्या फायद्याचा निर्णय घेतला आहे. आता विद्यार्थ्यांना हा परतावा थेट स्वतःच्या किंवा पालकांच्या बँक खात्यात मिळवण्यासाठी नोंदणी संकेतस्थळावर बँक तपशील भरण्याची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. युवा सेना नेते आणि महाराष्ट्राचे युवा आयकॉन निखिल काकडे यांनी केलेल्या आक्रमक आंदोलनामुळे आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे राज्यातील २.४ लाख विद्यार्थ्यांना तब्बल ३६ कोटी रुपयांचा परतावा सुरक्षितपणे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



युवा सेना नेते निखिल काकडे यांच्या आंदोलनाला मोठे यश

ग्रामीण आणि निमशहरी भागातील हजारो विद्यार्थ्यांकडे स्वतःची संगणकीय बँकिंग सुविधा नसते. त्यामुळे हे विद्यार्थी इंटरनेट कॅफे किंवा इतर डिजिटल केंद्रांवरून 'नीट'चे परीक्षा शुल्क भरतात. सर्वसाधारण नियमानुसार परतावा मूळ व्यवहार झालेल्या खात्यातच जमा होतो. जर ही जुनीच पद्धत राहिली असती, तर कोट्यवधी रुपयांचा हा निधी विद्यार्थ्यांऐवजी थेट इंटरनेट कॅफे चालकांच्या खात्यात जमा झाला असता. यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे आर्थिक नुकसान आणि शोषण होण्याची भीती निर्माण झाली होती. हा धोका ओळखून निखिल काकडे यांनी जिल्हा प्रशासनापासून ते थेट राष्ट्रीय परीक्षा अधिकाऱ्यांपर्यंत व्यापक आंदोलन आणि मोहीम राबवली. त्यांनी या गंभीर समस्येबाबत महाराष्ट्राचे मंत्री दादा भुसे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना परिस्थितीची जाणीव करून दिली. तसेच जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रीय परीक्षा संस्थेकडे तातडीने पारदर्शक आणि थेट परतावा प्रक्रिया लागू करण्याची मागणी केली. त्यांच्या या थेट हस्तक्षेपामुळे अखेर राष्ट्रीय परीक्षा संस्थेला आपल्या धोरणात सुधारणा करावी लागली.

या नव्या निर्णयामुळे महाराष्ट्रातील पुणे (४५,०००+), मुंबई (३८,०००+), ठाणे (२८,०००+), नागपूर (२२,०००+) आणि नाशिकसह इतर जिल्ह्यांतील एकूण २ लाख ४० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. प्रवर्गानुसार सामान्य प्रवर्गासाठी १,७००, अन्य मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १,६०० तर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि दिव्यांग प्रवर्गासाठी १,००० याप्रमाणे कोणतीही कपात न करता थेट खात्यात पैसे जमा होणार आहेत. 'डिजिटल व्यवहारांची पुरेशी माहिती नसलेल्या ग्रामीण विद्यार्थ्यांच्या पैशांचे संरक्षण करणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट होते. राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या या निर्णयामुळे संपूर्ण पारदर्शकता येईल आणि विद्यार्थ्यांचे आर्थिक शोषण टळेल,' असे युवा सेना नेते निखिल काकडे यांनी सांगितले. अधिकृत माहितीनुसार, विद्यार्थ्यांनी आपल्या बँक खात्याची आणि बँक ओळख संकेताची (आयएफएससी कोड) अचूक नोंद करणे आवश्यक असून, ही पडताळणी प्रणाली २७ मे २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. त्यानंतर अंतिम परतावा प्रक्रिया पूर्ण केली जाईल.

# वाळूज औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांनी गुंठेवारी नियमित करून घ्यावी –विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (CMRDA) हद्दीतील नागरिकांना कमी दरात बेटरमेंट चार्जेस भरून गुंठेवारी नियमित करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली असून, वाळूज औद्योगिक परिसरातील उद्योजकांनीही त्यांच्या जमिनी व बांधकामे दिलेल्या मुदतीत नियमित करून घ्यावीत, असे आवाहन महानगर आयुक्त तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केले.



वाळूज येथील मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर (MASSIA) कार्यालयात गुंठेवारी नियमितीकरण प्रक्रियेबाबत मार्गदर्शनपर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस महानगर नियोजनकार हर्षल बाविस्कर, सहआयुक्त अंजली धानोरकर, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी साधना बांगर, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक करूणा खरात यांच्यासह उद्योजक उपस्थित होते.

यावेळी बोलताना जी. श्रीकांत म्हणाले की, वाळूज एमआयडीसी परिसरात मोठ्या प्रमाणावर विनापरवाना व अनधिकृत बांधकामे झाली असून, त्यामुळे परिसरातील पायाभूत सुविधांवर ताण वाढत आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेशाचा नियोजनबद्ध आणि शाश्वत विकास साधण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली विकास योजनांमध्ये आवश्यक फेरबदलांची प्रक्रिया गतिमान करण्यात येत आहे. प्राधिकरणाच्या हद्दीत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियमबाह्य बांधकामांवर कारवाई करण्यात येणार असून, शासन नियमांनुसार ३१ डिसेंबर २०२० पूर्वीचीच विनापरवाना बांधकामे नियमित केली जाणार आहेत. त्यानंतरची बांधकामे अनधिकृत मानून हटविण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

तसेच, गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रमाणपत्र व बांधकाम परवाने नसल्यास बँकांनी गृहकर्ज मंजूर करू नये, असे निर्देश देण्यात आल्याचे सांगून भविष्यात अनधिकृत बांधकामे होणार नाहीत यासाठी उद्योजकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. वाळूज परिसरातील उद्योगांनी शहराच्या औद्योगिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावली असून, त्यामुळेच आज शहरात टोयोटासारखे उद्योग आले आहेत आणि छत्रपती संभाजीनगरला इलेक्ट्रिक व्हेईकल कॅपिटल म्हणून ओळख मिळत आहे, असे सांगून त्यांनी उद्योग क्षेत्रातील अनियमितता दूर करून हा परिसर आदर्श औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी उद्योजकांनी नियमितीकरण प्रक्रियेला प्रतिसाद द्यावा, असे नमूद केले.

उद्योजकांच्या शंकांचे निरसन व अर्ज स्वीकृतीसाठी MASSIA कार्यालयात उचठऊअ च्या अधिकाऱ्यांमार्फत मार्गदर्शन सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच, समाजकंटकांकडून त्रास होत असल्यास उद्योजकांनी केवळ संदेशाद्वारे तक्रार करावी, संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्राधिकरणामार्फत वाळूज औद्योगिक परिसर व ३६ गावांच्या झालर क्षेत्रासाठी नवीन पाणीपुरवठा योजना, कचरा व्यवस्थापन, फायर स्टेशन उभारणी आणि रस्ते विकासाची कामे लवकरच हाती घेतली जाणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

बैठकीत वर्ग-२ जमिनींचे वर्ग-१ मध्ये चुकीने रूपांतर, विनापरवाना हस्तांतरण अथवा विक्री झालेल्या जमिनींची प्रकरणेही गुंठेवारी नियमितीकरणात समाविष्ट करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या संदर्भात तहसीलदार व नायब तहसीलदारांकडून मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे.

यावेळी अभय योजनेंतर्गत गुंठेवारी विकास नियमितीकरणासाठी शुल्क सवलतीची माहिती देण्यात आली. त्यानुसार १ मे २०२६ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत बेटरमेंट चार्जेसवर केवळ १० टक्के शुल्क आकारले जाणार आहे. त्यानंतर १ ऑगस्ट २०२६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत ५० टक्के शुल्क आकारले जाईल, तर १ नोव्हेंबर २०२६ पासून पूर्ण शुल्क आकारण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

# खरीप हंगामासाठी विभागीय भरारी पथक स्थापन; गैरव्यवहार करणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशारा

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये शेतकऱ्यांना दर्जेदार कृषि निविष्ठा वेळेत आणि योग्य दरात उपलब्ध व्हाव्यात यासाठी कृषि विभाग यांच्या वतीने विभागीय स्तरावर भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागातील कृषि निविष्ठांचे वितरण, तपासणी आणि सनियंत्रण अधिक प्रभावीपणे करण्यासाठी जिल्हानिहाय पथके नियुक्त करण्यात आली आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्हासाठी ए.एल. काळुशे, तंत्र अधिकारी (गुणनियंत्रण) यांची पथक प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली असून पी.ए. ताजणे, मोहिम अधिकारी जिल्हा परिषद, एच.एस. कातोरे, जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक आणि एस.जी. बंडगर, विभागीय गुणनियंत्रण निरीक्षक यांची सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

जालना जिल्ह्यासाठी ए.एल. काळुशे यांची पथक प्रमुख, एन.डी. भदाणे आणि एम.के. काटे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर बीड जिल्ह्यासाठी ए.एल. काळुशे यांच्या नेतृत्वाखाली एस.जी. गरांडे आणि व्ही. पी. भोसले यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व पथकांसाठी एस.जी. बंडगर हे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

संपूर्ण विभागात चांगल्या प्रतीच्या कृषि निविष्ठांचे व्यवस्थित वितरण होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रभावी नियोजन करावे, तसेच शेतकऱ्यांची कोणतीही अडवणूक होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचना विभागीय कृषि सहसंचालक सुनिल वानखेडे यांनी दिल्या आहेत.

कृषि निविष्ठांच्या विक्रीमध्ये गैरव्यवहार, साठेबाजी किंवा जादा दराने विक्री आढळल्यास संबंधित उत्पादक अथवा विक्रेत्यांचे परवाने निलंबित अथवा रद्द करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येणार असून गंभीर प्रकरणांमध्ये फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही कृषि विभागाने दिला आहे.

# बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर गोमातेच्या अवैध वाहतुकीविरोधात राज्य सरकारचा बुलडोझर

मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)

आगामी बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर राज्यात गोमातेची अवैध वाहतूक, बेकायदेशीर कत्तलखाने आणि जनावरांवर होणाऱ्या अमानुष अत्याचारांविरोधात राज्य सरकारने आता कठोर भूमिका घेतली असून, गोमातेची तस्करी आणि कत्तल कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट आणि आक्रमक इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार परिवहन विभागाने संपूर्ण राज्यात विशेष तपासणी मोहीम राबविण्याचे आदेश दिले आहेत. सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी, उपप्रादेशिक अधिकारी, सीमा तपासणी नाके, तसेच वाहतूक यंत्रणेला २५ मे ते २८ मे २०२६ या कालावधीत युद्धपातळीवर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रयत्नातून राज्याने देशी गाईला 'राज्यमाता'चा सन्मान दिला आहे. हिंदू समाजासाठी गोमाता ही श्रद्धेचा आणि संस्कृतीचा विषय आहे. अशा पवित्र गोमातेची कत्तल करून तिची अवैध वाहतूक करणाऱ्यांना आता कायद्याचा कठोर धडा शिकवला जाईल.ङ्गते पुढे म्हणाले, विशिष्ट सणांच्या काळात गोमातेची तस्करी वाढते, गोवंशाला कोंबून, उपाशी ठेवून, अमानुष पद्धतीने वाहनांमध्ये भरले जाते. हा केवळ कायद्याचा भंग नसून हिंदू समाजाच्या श्रद्धांवर घाला आहे. अशा गोतस्करांविरोधात कठोरात कठोर कारवाई करण्यात येईल. परिवहन आयुक्त कार्यालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, राज्यातील सीमावर्ती भाग, मुंबईसह प्रमुख शहरे आणि संवेदनशील मार्गांवर विशेष नाकाबंदी व वाहन तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. जनावरांची वाहतूक करणाऱ्या प्रत्येक वाहनाची कसून तपासणी केली जाणार असून, आवश्यक परवानग्या, प्रमाणपत्रे आणि प्राणी कल्याण नियमांचे पालन झाले आहे का, याची पाहणी केली जाईल.

सरनाईक यांनी स्पष्ट केले की, ङ्गमोटार वाहन कायदा, प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायदा आणि केंद्र शासनाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना कोणतीही माफी दिली जाणार नाही.

नियमबाह्य वाहतूक करणारी वाहने थेट जप्त करण्यात येतील. या मोहिमेत परिवहन विभागासोबत स्थानिक पोलीस, वाहतूक पोलीस, पशुसंवर्धन विभाग आणि विविध गोसेवा व प्राणी कल्याण संस्थांचा समन्वय साधण्यात येणार आहे. अवैध कत्तलखान्यांना होणारा जनावरांचा पुरवठा रोखण्यासाठी विशेष पथकेही नियुक्त करण्यात आली आहेत.ङ्गगोमाता संरक्षण हा केवळ कायद्याचा विषय नसून हिंदुत्वाच्या अस्मितेचा प्रश्न आहे. मुक्या जनावरांवर अत्याचार करणाऱ्यांविरोधात सरकार झुकणार नाही. राज्य सरकार गोसंरक्षणासाठी कटिबद्ध आहे, असेही प्रताप सरनाईक यांनी ठामपणे सांगितले.या विशेष मोहिमेअंतर्गत करण्यात आलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल शासनाला सादर करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

# एशियाई ट्रॅम्पोलिन स्पर्धेसाठी शहरातील दोन खेळाडूंची भारतीय संघात निवड



छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

श्री छत्रपती जिमखाना जिम्नॅस्टिक सेंटर, विभागीय क्रीडा संकुल येथील कु. जिगीषा पवन जगदाळे व कु. आईरा वेंकटेश एकबोटे या दोन खेळाडूंची एशियाई ट्रॅम्पोलिन जिम्नॅस्टिक स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. चेन्नई येथे १५ ते १८ एप्रिलदरम्यान झालेल्या भारतीय संघ निवड चाचणीत त्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत ही निवड मिळिवली. २३ व २४ मे रोजी हाँगकाँग येथे ही स्पर्धा होणार आहे. या निवडीबद्दल दोन्ही खेळाडूंचा सत्कार महापौर समीर राजूरकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जिल्हा सचिव डॉ. हर्षल मोगरे, जिल्हाध्यक्ष डॉ. आदित्य जोशी, महाराष्ट्र सचिव डॉ. मकरंद जोशी, पश्चिम विभाग साई सेंटरच्या संचालिका डॉ. मोनिका घुगे, साई जिम्नॅस्टिक प्रशिक्षक संजय मोरे तसेच विभागीय क्रीडा संकुलाचे उपसंचालक शेखर पाटील उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी खेळाडूंना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. दोन्ही खेळाडूंच्या यशासाठी श्री छत्रपती जिमखाना जिम्नॅस्टिक सेंटरचे मुख्य प्रशिक्षक डॉ. रणजीत पवार, शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या अंजूताई मोहरीर व संतोष साबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पाकिस्तानी आणि बांगलादेशी नागरिकांना हिंदुस्थानी नागरिकत्वासाठी पासपोर्टची माहिती देणे बंधनकारक; गृह मंत्रालयाचा नवा नियम

नवी दिल्ली - वृत्तसंस्था

पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांगलादेशमधून येऊन हिंदुस्थानचे नागरिकत्व मिळवू इच्छिणाऱ्या लोकांसाठी गृह मंत्रालयाने एक नवा आणि महत्त्वाचा नियम जारी केला आहे. 'टीव्ही९ भारतवर्ष'ने दिलेल्या वृत्तानुसार, गृह मंत्रालयाने सोमवारी शेजारील देशांतील नागरिकांना हिंदुस्थानचे नागरिकत्व मिळवून देण्याबाबत एक नवा आदेश जारी केला आहे.

मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, जे लोक नागरिकत्व नियम, २००९ (Citizenshpi Rules, 2009) अंतर्गत हिंदुस्थानी नागरिकत्व मिळवू इच्छितात, त्यांना आता त्यांच्या मूळ देशाच्या पासपोर्टच्या स्थितीबद्दल सविस्तर माहिती देणे अनिवार्य असणार आहे.

**काय आहे नवीन नियम ?**

गृह मंत्रालयाने नागरिकत्व नियम, २००९ मध्ये एक महत्त्वाचा बदल करत एक नवीन परिच्छेद जोडला आहे. या नव्या नियमानुसार, अर्जदाराकडे पाकिस्तान, अफगाणिस्तान किंवा बांगलादेश सरकारच्या वतीने जारी करण्यात आलेला कोणताही वैध किंवा मुदत संपलेला पासपोर्ट नसावा.

पासपोर्टची माहिती देणे बंधनकारक

शासकीय अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणेः जर अर्जदाराकडे कोणताही सक्रिय पासपोर्ट असेल, तर त्या व्यक्तीला पासपोर्ट नंबर, तो जारी केल्याची तारीख, ठिकाण आणि त्याच्या मुदत समाप्तीची तारीख यासह इतर सर्व तपशील देणे आवश्यक आहे.

तसेच, नागरिकत्वाचा अर्ज मंजूर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत अर्जदाराला आपला वैध किंवा मुदत संपलेला पासपोर्ट संबंधित पोस्टाचे वरिष्ठ अधीक्षक किंवा पोस्ट अधीक्षकांकडे सुपूर्द करावा लागेल आणि त्याबाबतची माहिती देखील द्यावी लागेल.

**२०१९ च्या कायद्यात मोठा बदल**

हा नवीन नियम अनुसूची IC (डलहशर्वीश्रश खउ) नंतर जोडला जाईल. ही अनुसूची प्रामुख्याने पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानमधून आलेल्या हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारसी आणि ख्रिश्चन धर्मीय नागरिकांसाठी आहे, जे हिंदुस्थानचे नागरिकत्व मिळवू इच्छितात. जर अर्जदाराकडे कोणताही सक्रिय पासपोर्ट असेल, तर त्या व्यक्तीला पासपोर्ट नंबर, तो जारी केल्याची तारीख, ठिकाण आणि त्याच्या मुदत समाप्तीची तारीख यासह इतर सर्व तपशील देणे आवश्यक आहे.

तसेच, नागरिकत्वाचा अर्ज मंजूर झाल्यापासून १ ५ दिवसांच्या आत अर्जदाराला आपला वैध किंवा मुदत संपलेला पासपोर्ट संबंधित पोस्टाचे वरिष्ठ अधीक्षक किंवा पोस्ट अधीक्षकांकडे सुपूर्द करावा लागेल आणि त्याबाबतची माहिती देखील द्यावी लागेल.

**२०१९ च्या कायद्यात मोठा बदल**

हा नवीन नियम अनुसूची IC (Schedule IC) नंतर जोडला जाईल. ही अनुसूची प्रामुख्याने पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानमधून आलेल्या हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारसी आणि ख्रिश्चन धर्मीय नागरिकांसाठी आहे, जे हिंदुस्थानचे नागरिकत्व मिळवू इच्छितात.

# केईएम रुग्णालयात अत्याधुनिक 'व्हेसल सीलर' उपकरणांची उपलब्धता; गरीब रुग्णांना शस्त्रक्रियेत दिलासा मिळणार - मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)

राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम आणि सर्वसामान्यांना दर्जेदार उपचार मिळावेत या उद्देशाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. मुंबईतील सेठ जी. एस. मेडिकल कॉलेज आणि केईएम रुग्णालय येथे अत्याधुनिक 'हाय-एंड व्हेसल सीलर' (तशीींशश्र डशरश्रशी) उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली असून, यामुळे शस्त्रक्रियांच्या गुणवत्तेत मोठी सुधारणा होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना अत्याधुनिक उपचार सुविधा मिळणार आहेत. या सीएसआर प्रकल्पांतर्गत दोन प्रगत इलेक्ट्रोसर्जिकल युनिट्स जनरल सर्जरी विभागासाठी 'इलेक्टिव्ह सर्जरी ओटी' जमेशदजी मेहता शस्त्रक्रिया कक्षामध्ये बसविण्यात आले आहेत.

केईएम रुग्णालय हे मुंबईतील सर्वात मोठ्या सार्वजनिक आरोग्य संस्थांपैकी एक असून येथे दररोज हजारो गरजू रुग्ण उपचारासाठी येतात. अशा परिस्थितीत अत्याधुनिक उपकरणांची गरज अत्यंत महत्त्वाची होती. नव्याने बसविण्यात आलेली ही उपकरणे शस्त्रक्रियेदरम्यान रक्तस्त्राव नियंत्रणासाठी उपयुक्त ठरणार असून रक्तवाहिन्या सील करून रक्तस्राव त्वरित थांबवण्यास मदत करतात.

या उपकरणांमुळे शस्त्रक्रियेची अचूकता वाढेल, गुंतागुंत कमी होईल आणि रुग्णांच्या सुरक्षिततेत मोठी वाढ होईल. विशेषतः जटिल शस्त्रक्रियांमध्ये रक्तस्राव कमी होऊन डॉक्टरांना अधिक कार्यक्षमतेने उपचार करता येणार आहेत. या उपक्रमासाठी इंडियन ऑइल कंपनीने सहकार्य केले आहे त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आभार व्यक्त केले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत सांगितले की, 'राज्यातील प्रत्येक नागरिकाला गुणवत्तापूर्ण आणि अत्याधुनिक आरोग्य सेवा मिळणे ही शासनाची प्राथमिकता आहे. अशा प्रकल्पांमुळे सार्वजनिक रुग्णालयांची क्षमता वाढून गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळतो.' या उपक्रमामुळे केवळ आरोग्य सेवेची गुणवत्ता उंचावणार नाही, तर गरीब आणि वंचित घटकांसाठी आधुनिक वैद्यकीय सुविधांचा मार्गही अधिक सुलभ होणार आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केसरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही
( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199